महाराष्ट्र पोलीस

# पोलीस आयुक्तालय, नाशिक शहर

गंगापुर रोड, नाशिक –४२२००२

**Email Id:-** ccu.nashikcp@mahapolice.gov.in

II प्रेस नोट II          दिनांक २०/१०/२०२६

## सिंहस्थ कुंभमेळा २०२७

### धर्मध्वज शोभायात्रा /नगरप्रदक्षिणा, ध्वजारोहण व गोदावरी आरतीच्या अनुषंगाने ‘‘पोलीस बंदोबस्ताची रिअल टाईम रंगीत तालीम आयोजीत केलेबाबत’’

-----------ooo--------------

आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या अनुषंगाने नाशिक शहरात दिनांक ३० ऑक्टोबर २०२६ रोजी धर्मध्वज शोभायात्रा/नगरप्रदक्षिणाचे आयोजन करण्यात आलेले आहे. तसेच दिनांक ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी रामकुंड येथे ध्वजारोहण कार्यक्रम आणि सायंकाळी गोदावरी नदीकिनारी गोदावरी आरतीचे आयोजन करण्यात आलेले आहे.

सदर कार्यक्रमांच्या अनुषंगाने कायदा व सुव्यवस्था राखणे, वाहतूक नियोजन, गर्दीचे व्यवस्थापन तसेच भाविकांची सुरक्षितता सुनिश्चित करण्याच्या दृष्टीने नाशिक शहर पोलीस प्रशासनाकडून आवश्यक पोलीस बंदोबस्ताचे नियोजन करण्यात येत आहे.

मा. श्री. संदीप कर्णिक, पोलीस आयुक्त, नाशिक शहर यांच्या मार्गदर्शनाखाली सदर कार्यक्रमाच्या अनुषंगाने प्रत्यक्ष परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी तसेच बंदोबस्ताच्या नियोजनाची व अंमलबजावणीची पडताळणी करण्यासाठी रिअल टाईम पोलीस बंदोबस्ताची रंगीत तालीम आयोजीत करण्यात आली असुन ती पुढील प्रमाणे

| अ. क्र. | दिनांक | वेळ | कार्यक्रमाचे स्वरूप | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| ०१ | २१/१०/२०२६ | सायंकाळी ०४.०० ते ०७.०० | धर्मध्वज शोभायात्रा/ नगरप्रदक्षिणा | तपोवन ते रामकुंड |
| ०२ | २२/१०/२०२६ | सकाळी ११.०० ते ०१.०० | ध्वजारोहण | रामकुंड परिसर |
| | | सायंकाळी ०४.३० ते ०७.३० | गोदा आरती | भाजी बाजार पंटागण परिसर, रामकुंड |

दिनांक २१/१०/२०२६ रोजी आयोजीत सरावादरम्यान धर्मध्वज शोभायात्रा/ नगरप्रदक्षिणाच्या मार्गावरील बंदोबस्ताची आखणी, वाहतुक नियमन, गर्दी नियंत्रण तसेच संबंधीत यंत्रणांमधील समन्वयाची प्रत्यक्ष पडताळणी करण्यात येणार आहे. तसेच दिनांक २२/१०/२०२६ रोजी ध्वजारोहन व गोदावरी आरती या दोन्ही कार्यक्रमांच्या अनुषंगाने स्वतंत्र वेळेत संपुर्ण पोलीस बंदोबस्तासह रिअल टाईम रंगीत तालीम घेण्यात येणार आहे. या सरावाद्वारे बंदोबस्ताची प्रत्यक्ष अंमलबजावणी, प्रवेश व निर्गमन व्यवस्था वाहतुक व्यवस्थापन, गर्दी नियंत्रण आणि संभाव्य आपत्कालीन करावयाच्या उपाययोजनांची पडताळणी करण्यात येईल.

या प्रक्रियेदरम्यान बंदोबस्ताचे नियोजनात उद्भवणा-या संभाव्य अडचणींचा अभ्यास करून आवश्यक त्या सुधारणा करण्यात येणार आहेत. त्यामुळे प्रत्यक्ष कार्यक्रमाच्या वेळी पोलीस बंदोबस्त अधिक प्रभावीपणे कार्यान्वयीत करण्यास मदत होईल.

सिंहस्थ कुंभमेळ्याच्या अनुषंगाने आयोजित करण्यात येणारे सर्व कार्यक्रम सुरक्षित, सुरळीत व शांततेत पार पडावेत यासाठी नाशिक शहर पोलीस प्रशासनाकडून आवश्यक ती खबरदारी घेऊन पूर्वतयारी करण्यात येत आहे.